**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :-१२/४/२०१२

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे अनुसूची "ड" मधील प्रकरण-२अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा क्रमांक २ बुधवार दि.११/०४/२०१२ रोजी दुपारी १.००वाजता बोलावण्यांत आलेली व तहकुब करण्यांत आलेली **सभा क्रमांक-२ शुक्रवार दिनांक १३/४/२०१२ रोजी दुपारी १.००वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

प्रत- सर्व खाते प्रमुख व शाखा प्रमुख यांना माहितीस व उपस्थित रहाणेकामी

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- ७/४/२०१२

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र.२ बुधवार दि.११/४/२०१२ रोजी दुपारी १.००वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये. अहमदनगर महानगरपालिका.

**बुधवार दिनांक- ४/४/२०१२ ची विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय सुची |
|---|---|
| १ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१६ मंगळवार दिनांक २८/०२/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| २ | अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील बालिकाश्रम रस्त्याचे विद्युती करण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ३ | अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील लालटाकी नेहरू पुतळा ते सर्जेपुरा चौक ते फलटण पोलिस चौकी पर्यत विद्युती करण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ४ | अहमदनगर महानगरपालिकेचे नेहरू मार्केट चितळे रोड येथील सि.स.नं. २०८ येथे व्यापारी संकुल व भाजीमंडई म.न.पा.मालकीची जागा खाजगी विकासकामार्फत विकसित (एफ.बी.टी.तत्वावर ) करणेबाबतची प्रिमिअम रक्कम ठरविणे व इतर अटी व शर्तीसह प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५ | श्री. सय्यद अशपाक काजम, फकिरवाडा यांचे नळ कनेक्शन नसतांना त्यांना देण्यांत आलेले सन २००१-२०१२ अखेर ( वॉर्ड क्र.८५ बील क्रमांक ९२१) पाणीपटटी रूपये १६,७००/- चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

P.T.O.



| | |
|---|---|
| ६ | श्री.गवळी नवनाथ पंढरीनाथ, अलमास पार्क, मुकुंदनगर यांचे नळ कनेक्शन नसतांना त्यांना देण्यांत आलेले सन २००७-२०१२ अखेर ( वॉर्ड क्र.८६ बील क्रमांक ७२५) पाणीपटटी रूपये १०,५००/- चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ७ | अहमदनगर महानगरपालिकेच्या तिर्थक्षेत्र विकास योजना अंतर्गत अहमदनगर बस्थस्थानक ते माळीवाडा येथील विशाल गणपती मंदिर पोच रस्ता तयार करणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ८ | अहमदनगर महानगरपालिकेचे पोहोच रस्ते विकसित करणे या लेखाशिर्षा अंतर्गत प्रभाग क्रमांक ४ मध्ये नामदेव चौक ते नित्यसेवा ते भगवानबाबा चौक ते तपोवन रोड पर्यतंचा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत**- १] विषय क्र. १ - मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१६ मंगळवार दिनांक २८/०२/२०१२ रोजीच्या सभेच्या इतिवृत्ताची प्रत

२] विषय-क्रमांक- २ ते ८ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- २**

विषय क्रमांक- १ शुक्रवार दिनांक १३/४/२०१२

ठराव क्रमांक- १ शुक्रवार दिनांक १३/४/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१६ मंगळवार दिनांक २८/०२/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१६ मंगळवार दिनांक २८/०२/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.
सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्यें वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मागील सभा दिनांक २८/०२/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देणे विषयी इतिवृत्त आहे.

मा.श्री.सातपुते दि.ना.:- मागील दिनांक ११/४/२०१२ रोजी आयोजित करण्यांत आलेली मा.स्थायी समिती सभा तहकुब का करण्यांत आली.

प्र.नगरसचिव श्री.शित्रे :- अधिकारी व विभाग प्रमुख सभेस उपस्थित नसल्यामुळे सभा तहकुब करावी लागली होती.

मा.श्री.सातपुते दि.ना.:- मा.स्थायी समितीची विषय पत्रिका दिल्यानंतर अधिकारी कर्मचारी यांना सभेस गैरहजर राहता येते काय.

प्र.नगरसचिव श्री.शित्रे :- मा.स्थायी समितीची विषय पत्रिका दिल्यानंतर मा.स्थायी समितीस हजर रहाणे आवश्यक आहे.

मा.श्री.लोंढे सु.सो.:- मा.स्थायी समितीस शासकीय अधिकारी उपस्थित का राहिले नाहीत. महानगरपालिका कर्मचा-यांच्या आंदोलनामध्ये शासकीय अधिका-यांना सहभागी होता येते कां ? अधिका-यांच्या अनुपस्थितीत मा.स्थायी समिती सदस्यांनी घेतलेला निर्णय त्यांना मान्य होईल का ?

प्र. नगरसचिव श्री. शित्रे :- तशी काही तरतूद नाही.अधिकारी नसतांना मा.स्थायी समितीने घेतलेले निर्णय मान्य होतो.

मा.उपायुक्त :- दिनांक ११/०४/२०१२ रोजी महानगरपालिका कर्मचा-यांस झालेल्या मारहाणी बाबत व त्यामुळे महानगरपालिका कार्यालयीन कामकाज बंद ठेवत असल्याबाबत मा.सभापती स्थायी समिती यांना मी व माझ्या सहका-यांनी समक्ष येवुन आज दिनांक ११/०४/२०१२ रोजी कामकाज बंद ठेवत असल्याबाबत व मा.स्थायी समितीस उपस्थित रहाणार नसलेबाबत. समक्ष कल्पना दिलेली होती.

मा.श्री. लोंढे सु.सो.:- आमच्या प्रभागामध्ये कचरा संकलन करणारी कचरा गाडी गेल्या चार महिन्यापासुन बॅटरी अभावी बंद आहे. पर्यायी गाडी कचरा संकलनासाठी येत नाही. बॅटरी सारख्या किरकोळ कामाकरीता तीन-तीन महिने गाडी बंद राहिली तर कसे होईल.

मा.उपायुक्त (कर)सौ. झगडे मॅडम :- पर्यायी गाडी उपलब्ध करण्यांत येवुन कचरा संकलन करुन घ्यावा.

मा.श्री.लोंढे सु.सो.:-मागील सभा दिनांक २८/०२/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- मागील सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :-मा.स्थायी समिती सभा दिनांक २८/०२/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठरावः-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१६ मंगळवार दिनांक २८/०२/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-<br>
सभापती,<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- २**

विषय क्रमांक- २ शुक्रवार दिनांक १३/४/२०१२

ठराव क्रमांक- २ शुक्रवार दिनांक १३/४/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील बालिकाश्रम रस्त्याचे विद्युती करण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. जा.क्र. विद्युत विभाग- ३६२ दि. /०२/२०१२

विषय- ई- निविदा क्र. १३३ च्या मंजुरी बाबत.

कामाचे नांवः-महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील बालिकाश्रम रस्त्याचे विद्युती करण करणे (निविदा रक्कम रू.२८,३९,७२६/-)

उपरोक्त विषयाबाबत खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता : मा. शासन निर्णय क्र. नगरो-२०१०/प्र.क्र.२४२/नवि-३३ मंत्रालय मुंबई-३२ यांचे दिनांक ३१/३/२०११ अन्वये मंजुरी.

२] प्रशासकीय मान्यता रक्कम रू. :- ९८६.८९ लक्ष (रस्ता + विद्युत )

३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. :- २८,३९,७२६/-

४] तंात्रिक मान्यतेची दरसुची :- सा.बां.वि. विद्युत- २०१०-११

५] निविदा (परिशिष्ट 'ब') रक्कम रू. :- २८,३९,७२६/-

६] निविदा प्रसिध्दी तारीख :- ई- निविदा क्र. १२७ ते १४० दि.१२/१२/२०११ दै. सकाळ (ई-निविदेबाबतची सुचना )

७] निविदा विक्री कालावधी :- १३/१२/२०११ ते २०/१२/२०११ ई - निविदा क्र.१२७ ते १३६

८] निविदा स्विकारण्याची तारीख :- दि.२६/१२/२०११ ते दि. ३०/१२/२०११ अखेर.

९] निविदा उघडण्याची तारीख :- ३१/१२/२०११

१०] कामाची मुदत :- ६ महिने

११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :-

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | एस.एस. इलेक्ट्रीक कंपनी, डोंबिवली , जि. ठाणे | २५ % जादा |
| २ | मे. उरमुडे इलेक्ट्रोमेक इंडस्ट्रीज, अहमदनगर | २२ % जादा |
| ३ | मे. यश इलोक्ट्रोलाईन , चिंचवड , जि. पुणे | २६ % जादा |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने **मे. उरमुडे इलेक्ट्रोमेक इंडस्ट्रीज, अहमदनगर** यांचा देकार सर्वात कमी म्हणजे निविदा दरापेक्षा **२२% जादा** आहे. निविदा धारकाने भरलेल्या दराची सन २०११-१२ सा.बां.वि. विद्युतच्या चालु दरसुचीशी तुलना करता सदरचा दर **७.१७%** जादा येत आहे.संबंधीत कमी दराचे निविदा धारकास निविदा दराच्या वाटाघाटी मा.उपायुक्त (सा.) यांचे दालनात दि.१६/०१/२०११ रोजी स.११.००वाजता समक्ष उपस्थित राहणेबाबत विद्युत विभाग जा.क्र. २८१ दि. १२/०१/२०१२अन्वये पत्र दिले असता त्यानी दि.१६/०१/२०१२ रोजीचे सदरचे काम सन २०११-२०१२ अंदाजपत्रकीय दराने करणेस तयार असेल बाबत कळविले आहे. सदरचा दर निविदा दरापेक्षा **१३.८३%** जादा येत आहे. (म्हणजे सन २०११-२०१२ सा.बां.वि. विद्युतच्या चालु दरसुचीशी तुलना करता सदरचा दर **०.०० %** येत आहे.) सदरचा तुलनात्मक तक्ता मा.छाननी समोर दि.२५/०१/२०१२ रोजी ठेवला असता मा.छाननी समितीने सदर काम **मे. उरमुडे इलेक्ट्रोमेक इंडस्ट्रीज** यांना सदरचे काम निविदा दरापेक्षा **१३.८३%** जादा दराने देणेची शिफारस करण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १२ | सुधारित देकारानुसार येणारी किंमत | रू.३२,३२,५०६/- |
| १३ | चालु दरसुची सा.बां.वि. विद्युतच्या २०११-१२अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू.३२,३२,५०६/- |
| १४ | ठेकेदाराची सुधारित किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | निरंक |
| १५ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (१४ x १००) / १२ | ०.००% जादा |

तरी मा.छाननी समितीने केलेल्या शिफारशीनुसार सदरची निविदा ठेकेदारास निविदा दरापेक्षा **१३.८३% जादा** (सन २०११-२०१२ सा.बां.वि. विद्युतच्या चालु दरसुचीशी तुलना करता सदरचा दर **०.००%जादा**)दराने देणेस सदरची निविदा मंजुरीस्तव तथा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव पाठविणेस मा.आयुक्त यांनी दि.२५/०१/२०१२ अन्वये मान्यता दिल्यानुसार सदरची निविदा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील बालिकाश्रम रस्त्याचे विद्युतीकरण करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- ऑफिस रिपोर्टानुसार मंजूर करावा.

मा.श्री. लोंढे सु.सो.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मंजुरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील बालिकाश्रम रस्त्याचे विद्युती करण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता मा.छाननी समितीने शिफारस केल्यानुसार स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा धारक मे. उरमुडे इलेक्ट्रोमेक इंडस्ट्रीज, अहमदनगर यांनी वाटाघाटी अंती कमी करून दिलेल्या निविदा दरापेक्षा १३.८३% जादा (सन २०११-२०१२ सा.बां.वि. विद्युतच्या चालु दरसुचीशी तुलना करता सदरचा दर ०.००%जादा)दराने देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- २**

विषय क्रमांक- ३ शुक्रवार दिनांक १३/४/२०१२

ठराव क्रमांक- ३ शुक्रवार दिनांक १३/४/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील लालटाकी नेहरू पुतळा ते सर्जेपुरा चौक ते फलटण पोलिस चौकी पर्यत विद्युती करण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. जा.क्र. विद्युत विभाग- ३७८ दि.९/०३/२०१२

विषय- ई- निविदा क्र. १३२ च्या मंजुरी बाबत.

कामाचे नांव:-महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील लालटाकी नेहरू पुतळा ते सर्जेपुरा चौक ते फलटण पोलिस चौकी पर्यत विद्युती करण करणे.

उपरोक्त विषयाबाबत खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता : मा. शासन निर्णय क्र. नगरो-२०१०/प्र.क्र.२४२/नवि-३३ मंत्रालय मुंबई-३२ यांचे दिनांक ३१/३/२०११ अन्वये मंजुरी.

२] प्रशासकीय मान्यता रक्कम रू. :- ५१३.६२ लक्ष (रस्ता + विद्युत)

३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. :- २४,५२,८९८/-

४] तंात्रिक मान्यतेची दरसुची :- सा.बां.वि. विद्युत- २०१०-११

५] निविदा (परिशिष्ट 'ब') रक्कम रू. :- २४,५२,८९८/-

६] निविदा प्रसिध्दी तारीख :- ई- निविदा क्र. १२७ ते १४० दि.१२/१२/२०११ दै. सकाळ (ई-निविदेबाबतची सुचना )

७] निविदा विक्री कालावधी :- १३/१२/२०११ ते २०/१२/२०११ ई - निविदा क्र.१२७ ते १३६

८] निविदा स्विकारण्याची तारीख :- दि.२६/१२/२०११ ते दि. ३०/१२/२०११ अखेर.

९] निविदा उघडण्याची तारीख :- ३१/१२/२०११

१०] कामाची मुदत :- ६ महिने

११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :-

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | एस.एस. इलेक्ट्रीक कंपनी, डोंबिवली , जि. ठाणे | २८ % जादा |
| २ | मे. उरमुडे इलेक्ट्रोमेक इंडस्ट्रीज, अहमदनगर | १८ % जादा |
| ३ | मे. यश इलोक्ट्रोलाईन , चिंचवड , जि. पुणे | १९.५० % जादा |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने **मे. उरमुडे इलेक्ट्रोमेक इंडस्ट्रीज, अहमदनगर** यांचा देकार सर्वात कमी म्हणजे निविदा दरापेक्षा **१८% जादा** आहे. निविदा धारकाने भरलेल्या दराची सन २०११-१२ सा.बां.वि. विद्युतच्या चालु दरसुचीशी तुलना करता सदरचा दर **६.०५%** जादा येत आहे.संबंधीत कमी दराचे निविदा धारकास निविदा दराच्या वाटाघाटी मा.उपायुक्त यांचे दालनात दि.१६/०१/२०११ रोजी स.११.००वाजता समक्ष उपस्थित राहणेबाबत विद्युत विभाग जा.क्र. २८० दि. १२/०१/२०१२अन्वये पत्र दिले असता त्यानी दि.१६/०१/२०१२ रोजीचे सदरचे काम सन २०११-२०१२ अंदाजपत्रकीय दराने करणेस तयार असेल बाबत कळविले आहे.

सदरचा दर निविदा दरापेक्षा **११.२६%** जादा येत आहे. (सन२०११-२०१२ सा.बां.वि. विद्युतच्या चालु दरसुचीशी तुलना करता सदरचा दर **०.००%**) सदरचा तुलनात्मक तक्ता मा.छाननी समोर दि.१८/०१/२०१२रोजी ठेवला असता मा.छाननी समितीने **मे.उरमुडे इलेक्ट्रोमेक इंडस्ट्रीज, अहमदनगर** यांना सदरचे काम निविदा दरापेक्षा **११.२६% जादा** दराने देणेची शिफारस करण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १२ | सुधारित देकारानुसार येणारी किंमत | रू.२७,२९,१२५/- |
| १३ | चालु दरसुची सा.बां.वि. विद्युतच्या २०११-१२अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू.२७,२९,१२५/- |
| १४ | ठेकेदाराची सुधारित किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | निरंक |
| १५ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (१४ x १००) / १२ | ०.००% जादा |

तरी मा.छाननी समितीने केलेल्या शिफारशीनुसार सदरची निविदा ठेकेदारास निविदा दरापेक्षा **११.२६% जादा** (सन २०११-२०१२ सा.बां.वि. विद्युतच्या चालु दरसुचीशी तुलना करता सदरचा दर **०.००%जादा**)दराने देणेस सदरची निविदा मंजुरीस्तव तथा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव पाठविणेस मा.आयुक्त यांनी दि.१३/०१/२०१२ अन्वये मान्यता दिल्यानुसार सदरची निविदा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :-महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील लालटाकी नेहरू पुतळा ते सर्जेपुरा चौक ते फलटण पोलिस चौकी पर्यत विद्युती करण करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.भोसले ग.पुं.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मंजुरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील लालटाकी नेहरू पुतळा ते सर्जेपुरा चौक ते फलटण पोलिस चौकी पर्यत विद्युती करण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता मा.छाननी समितीने शिफारस केल्यानुसार स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा धारक मे. उरमुडे इलेक्ट्रोमेक इंडस्ट्रीज, अहमदनगर यांनी वाटाघाटी अंती कमी करून दिलेल्या निविदा दरापेक्षा ११.२६% जादा (सन २०११-२०१२ सा.बां.वि. विद्युतच्या चालु दरसुचीशी तुलना करता सदरचा दर०.००%जादा)दराने देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- २**

विषय क्रमांक- ४ शुक्रवार दिनांक १३/४/२०१२

ठराव क्रमांक- ४ शुक्रवार दिनांक १३/४/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे नेहरू मार्केट चितळे रोड येथील सि.स.नं.२०८ येथे व्यापारी संकुल व भाजीमंडई म.न.पा.मालकीची जागा खाजगी विकासकामार्फत विकसित (एफ.बी.टी.तत्वावर) करणेबाबतची प्रिमिअम रक्कम ठरविणे व इतर अटी व शर्तीसह प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा नगररचना विभाग जा.क्र.टि.पी.४३६६ दिनांक ०१/०३/२०१२

प्रस्तावना-विषय :-नेहरू मार्केट, चितळे रोड येथील सि.स.नं.२०८ येथे व्यापारी संकुल व भाजी मंडई खाजगी विकासकामाफत विकसित करणेबाबत.

संदर्भ :- १] मा.स्थायी समिती ठराव क्र.११ दि.१३/१२/२०११

२] या विभागाचा दि.२२/१२/२०११ रोजीचा अहवाल.

उपरोक्त मा.स्थायी समितीने ठराव क्र.११ दि.१३/१२/२०११ अन्वये उपरोक्त विषयाबाबत ठराव पारित केलेला आहे. या ठरावात प्रस्तावातील प्रिमिअम बाबत विसंगती दिसून आल्याने याबाबत पुन्हा स्वयंस्पष्ट अहवाल सादर करणे बाबत निर्देशित करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने या विभागाने संदर्भ क्र.२ अन्वये इकडील अहवाल सादर केलेला आहे. या अहवालात यापूर्वी या विभागाने निश्चित केलेला प्रिमिअम रू.२कोटी व चितळे रस्ता विकसित करणेसाठी रू.५० लाख इतक्या प्रिमिअम बाबत हा विभाग कायम असल्याचे नमूद केले आहे. तसेच इतरही अटींबाबत पूर्वीच्या अहवालाशी हा विभाग आजही कायम असल्याचे नमूद केले आहे.

वरिष्ठ पदाधिकारी व मा. आयुक्त यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार श्री. बल्लाळ यांनी सांगली महानगरपालिकेस भेट देवून तेथील प्रस्तावांची पहाणी केली. या तपासणीमध्ये या विभागाने पूर्वी तयार केलेला प्रस्ताव सुसंगत व संयुक्तीक असल्याचे आढळून आले. त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या B.O.T. तत्वा अंतर्गत धोरणांची परिपत्रके, शासन निर्णयांचा संग्रह उपलब्ध करून घेण्यात आला व त्यामधील विविध परिपत्रकांचा अभ्यास करण्यात आला. याही निकषावर या विभागाने पूर्वी तयार केलेला प्रस्ताव योग्य वाटतो. या व्यतिरिक्त मा. संचालक, नगरपालिका प्रशासन यांनी वेळोवेळी निर्गत केलेल्या मार्गदर्शक तत्वांचा देखील अभ्यास करण्यात आला. या निकषांवर देखील पूर्वीचा अहवाल योग्य आहे असे दिसते.

सबब या सर्व कागदपत्रांचा श्री. बल्लाळ (शाखा अभियंता) यांनी सांगली महानगरपालिकेस भेट देवून जमा केलेल्या माहितीचा विचार करता पूर्वीच्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे प्रिमिअम रक्कम ठरवून व इतर अटी शर्तीसह हा प्रस्ताव मंजूर करणे योग्य होईल.

सबब प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहे.

येणेप्रमाणे नगररचनाकार यांचा अहवाल असे.

--**--

नगररचना विभाग दि.२२/१२/२०११

सादर,

विषय- सि.स.नं. २०८ नेहरू मार्केट , चितळे रोड ही म.न.पा. मालकीची जागा खाजगी विकासका मार्फत विकसित करणेबाबत.

संदर्भ :-१] मा.स्थायी समिती ठराव क्र.७२ दि.१०/१२/२०१०

२] मा.स्थायी समिती ठराव क्र.६५ दि.१३/१२/२०११

उपरोक्त विषयान्वये अहवाल सादर करण्यात येतो की, मा.स्थायी समितीने ठराव क्र.६५ दिनांक १३/१२/२०११ अन्वये सि.स.नं. २०८ नेहरू मार्केट , चितळे रोड ही म.न.पा. मालकीची जागा खाजगी विकासका मार्फत विकसित करणेसाठी विकासकाला देण्यात येणा-या प्रिमीयम बाबत स्वयंस्पष्ट अहवाल मागीतलेला आहे.

मा.स्थायी समिती ठराव क्र.७२ दिनांक १२/१०/२०१० अन्वये विषयांकित जागा विकसित करणेसाठी नगररचना विभागाने रू.२.०० कोटी व ५०.०० लाख रू. चितळे रस्ता विकसित करणेसाठी इतका प्रिमियम निश्चित केला होता. सदर रक्कम निश्चित करताना सदर परिसरात चालु असलेल्या मिळकतीचे दर विचारात घेण्यात आले होते. सन २०११ चे शासकीय रेडीरेकनरचे दर विचारात घेता सदर प्रिमियमची रक्कम उपरोक्त रकमेपेक्षा कमी येत आहे.

अहमदनगर शहरातील चालु मिळकतीचे दर व त्याचा उठाव इत्यादी बाबी विचारात घेता आजही नगररचना विभागा नेहरू मार्केट विकासासाठी रू.२.०० कोटी व ५०.०० लाख चितळे रस्ता विकसित करणेसाठी इतक्या प्रिमियम रकमेवर कायम आहे. व तसेच मा.स्थायी समिती ठराव क्र.७२ दि.१०/१२/२०१० मधील या विभागाच्या मुल्यांकन अहवालातील सर्व मुद्दे व अटींसह सि.स.ंन. २०८ नेहरू मार्केट , चितळे रोड ही मनपा मालकीची जागा खाजगी विकासकामार्फत विकसित करणेसाठी प्रिमियमची रक्कम निश्चित करणे योग्य होईल. आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे नगररचनाकार यांचा अहवाल असे.

--**--

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- प्रस्तावीतप्रमाणे मा.स्थायी समिती ठराव क्र.७२ दिनांक १०/१२/२०१० अन्वये नेहरू मार्केट F.B.T. तत्वावर बांधण्यासाठी निश्चित केलेला प्रिमीयम व नगररचनाकार यांनी प्रस्तावीत केलेला प्रिमीयम यामध्ये मोठी तफावत असल्याने प्र. शहर अभियंता यांनी मुळ प्रस्तावात ज्या निकषावर / आधारवर प्रस्ताव पाठविता त्यासंदर्भात अहवाल तसेच उपरोक्त कारणाने सदरील प्रकरणी प्र. शहर अभियंता यांचा अभिप्राय घेणे योग्य होईल. तथापी त्यानुसार आदेशार्थ सादर. दि.२६/१२/२०११

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.२७/१२/२०१० **CE**

प्र. शहर अभियंता :- मा.फेर सादर, सिटी सर्व्हे क्र.२०८ नेहरू मार्केट येथे FBT तत्वावर संकुल व भाजी मंडई बांधणे बाबतचे काम प्रस्तावीत आहे. सदर जागा हि गावठाणातील मुख्य रस्त्यालगत व मुख्य बाजारपेठेतील आसल्याने जागेची बाजार भावाप्रमाणे किंमत गृहित धरून महानगरपालिकेस जास्तीत जास्त आर्थिक फायदा होण्याच्या दृष्टीने प्रिमीयमची किंमत ठरविण्यात आली होती. परंतु सदर बाब ही मा. नगररचना विभागाचे अखत्यारीत आसल्याने मा. नगररचनाकार यांचा अभिप्राय घेवुन पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे असे सुचविले होते. सद्यस्थितीत जागेचे मुल्य ठरविण्याचे (प्रिमीयम ठरविणे) ही बाब नगररचना विभागाचे अखत्यारीत असल्याने प्रिमीयम व अटी शर्ती बाबत मा. नगररचना विभागाकडुन कार्यवाही होणे योग्य वाटते आदेशार्थ सादर. दि.२/१/२०१२

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- उपरोक्त प्र. शहर अभियंता यांचे अहवालाप्रमाणे नगररचनाकार यांचा नेहरू मार्केट विकासकासाठीचा प्रिमीयम व अटी शर्ती संदर्भातील अहवाल मा.स्थायी समिती ठराव क्र.६५ दिनांक १३/१२/२०११ अन्वये सभे पुढे निर्णयास्तव ठेवण्यास मान्यतेस्तव सादर. दि.४/१/२०१२

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दिनांक ५/१/२०१२

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- नेहरू मार्केट चितळे रोड येथील सि.स.नं.२०८ येथे व्यापारी संकुल व भाजीमंडई म.न.पा.मालकीची जागा खाजगी विकासकामार्फत विकसित (एफ.बी.टी.तत्वावर) करणेबाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो.:- सदर विषयाचा प्रस्ताव वाचून दाखवावा. तसेच मागील वेळी नेहरुमार्केट संदर्भात किती प्रिमीयम ठरविलेला होता.

नगररचनाकार श्री.धोंगडे :- नेहरुमार्केट येथे अद्यावत भाजी मार्केट उभारणे कामी २.५० कोटी प्रिमीयम दिलेला होता त्यापैकी रक्कम रु.५०.०० लाख चितळेरोड रस्त्या विकसित करणेकरीता वापरावयाचे होते.

मा.श्री. लोंढे सु.सो.:- नेहरुमार्केट येथील इमारत दान दिलेली होती काय? सध्या इमारत नसल्याने सदरची जागा परत देण्याबाबत संबंधितांनी मागणी केली आहे. सदरची जागा खाजगी होती काय ?

नगररचनाकार श्री.धोंगडे :- नेहरु मार्केट साठी असणारी जागा महानगरपालिकेने अधिकृत अधिग्रहण केलेली आहे. सदर जागेचा पुर्वी असलेला भाजी मंडई व गाळे तोच वापर ठेवलेला आहे. त्यामुळे अडचण नाही.

मा.सभापती साहेब :- इतर अटी व शर्ती सांगावेत.

नगररचनाकार श्री.धोंगडे :- नेहरू मार्केट प्रकल्पाची प्रिमियम रक्कम दोन कोटी व चितळ रोड सुशोभिकरणासाठी रूपये ५० लाख ही महत्वाची अट आहे. तसेच पुर्वीच्याच अटी व शर्ती आहेत.

मा.श्री. लोंढे सु. सो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. भोसले ग.पुं.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- यापुर्वी निविदा मागवूनही कोणी ठेकेदार प्रतिसाद देत नाही. त्याकरीता मा. नगररचनाकार यांचे अहवालानुसार ऑफिस रिपोर्टास सर्वानुमते मंजुरी दयावी.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेचे नेहरू मार्केट चितळे रोड येथील सि.स.नं.२०८ येथे व्यापारी संकुल व भाजीमंडई म.न.पा.मालकीची जागा खाजगी विकासकामार्फत विकसित (एफ.बी.टी.तत्वावर) करणेकामी खाजगी विकासका यांचेकडून घ्यावयाची प्रिमियम रक्कम रूपये २,००,००,०००/-( रूपये दोन कोटी मात्र ) व चितळे रोड सुशोभिकरणासाठीची रक्कम रूपये ५०,००,०००/-(रूपये पन्नास लाख मात्र) निश्चित करून इतर अटी व शर्ती सह प्रस्तावास मंजुरी देण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- २**

विषय क्रमांक- ५ शुक्रवार दिनांक १३/४/२०१२

ठराव क्रमांक- ५ शुक्रवार दिनांक १३/४/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** श्री. सय्यद अशपाक काजम, फकिरवाडा यांचे नळ कनेक्शन नसतांना त्यांना देण्यांत आलेले सन २००१-२०१२ अखेर (वॉर्ड क्र.८५ बील क्रमांक ९२१) पाणीपटटी रूपये १६,७००/- चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा प्रभाग समिती क्र.३ दि.१६/१२/२०११

विषय- नळ कनेक्शन नसलेबाबत.

संदर्भ :- श्री. सय्यद अशपाक काजम यांचा दि.२१/११/२०११ रोजीचा अर्ज.

सादर,

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, श्री. सय्यद अशपाक काजम यांनी इकडेस अर्ज देउन विनंती केली की,"आमच्या मिळकतीमध्ये पिठाची गिरणी होती. पिठाची गिरणी असल्याने आम्ही कधीही नळ कनेक्शन घेतलेले नाही. त्यामुळे पाणीपट्टीची केलेली आकारणी रद्द करावी. तसेच सदरची पिठाची गिरणी सन २००८-०९ या आर्थिक वर्षात बंद केलेली आहे." अशी विनंती केलेली आहे.

वास्तविक परिस्थीती अशी की, वॉर्ड क्र.८५ बील क्र. ९२१ वर श्री. सय्यद अशपाक काजम यांची मिळकत आहे. सन २००३-०४ या वित्तीय वर्षात रिव्हीजनचे सर्व्हेशन करण्यांत आलेले आहे. रिव्हीजनच्या सर्व्हेशनामध्ये सदर मिळकतीमध्ये पिठाची गिरणी दाखविण्यांत आलेली आहे. त्यानुसार सदर मिळकतीवर वाणिज्य प्रमाणे कर आकारणी केलेली आहे.

दरम्यानच्या काळात श्री. सय्यद अशपाक काजम यांनी पिठाची गिरणी बंद केल्याबाबत अर्ज सादर केलेला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने प्रस्ताव सादर करण्यात येउन मा.उपायुक्त साहेब यांनी मान्यता दिलेली आहे. सध्या त्या मिळकतीवर सन २००१ ते २०१२ अखेर घरपट्टी रू.२,९१८/- व पाणीपट्टी रू.१६,७००/- अशी दोन्ही मिळुन रू.१९,६१८/- इतकी शास्ती वगळता थकबाकी आहे.

अर्जदार यांच्या अर्जानुसार सदर ठिकाणी नळकनेक्शन आहे किंवा नाही ? या बाबतचा अहवाल या प्रभागाकडील पाणी पुरवठा फिटर यांना जा.क्र. ७८३ दि.१२/१२/११ अन्वये अहवाल सादर करणे बाबत कळविले असता पाणी पुरवठा फिटर यांनी श्री. सय्यद अशपाक काजम, फकिरवाडा यांच्या मिळकतीची दि.१४/१२/२०११ रोजी समक्ष पाहणी करून सदर ठिकाणी नळ कनेक्शन आढळुन आलेले नाही असा अहवाल दि.१४/१२/२०११ रोजी सादर केलेला आहे. / **अ**

सदरचा अहवाल सादर केल्यानंतर दि.१५/१२/२०१० रोजी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी नळकनेक्शन आढळुन आलेले नाही. त्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ व ४८५/१ नुसार सन २००१ ते २०१२ पासुन रू.१६,७००/- इतकी आकारलेली पाणीपट्टी रद्द करणे उचित वाटते, तथापी आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे वसुली मदतनीस प्रभाग समिती क्र.३ यांचा अहवाल असे.

कर निरीक्षक :- सादर, वसुली मदतनीस यांचे समक्ष पहाणी केली असता सदर ठिकाणी नळ कनेक्शन आढळुन आलेले नाही.

प्रभाग अधिकारी:-रिपोर्ट व करनिरीक्षक यांचे रिपोर्ट व शे-याचे अवलोकन केले तपासून सादर करावे.
सहाय्यक मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी :- सदरचे प्रकरण मा. आयुक्त साहेब यांनी जा.क्र. साप्रवि २११३ दिनांक २०/९/२०१० ते तपासणीसाठी नेमलेल्या कमिटी पुढे सादर करावे. सहाय्यक मुख्य निर्धारक तथा संकलन अधिकारी यांचे अभिप्रायानुसार पुढील आदेशार्थसादर.
मुख्य लेखापरिक्षक:- नळ पहाणी समिती
मा.उपायुक्त (कर) :- पाहणी समिती अहवालासह पुढील पाणीपट्टी निर्लेखित करणेस्तव मा.स्थायी समिती पुढे ठेवणेस मान्यतेस्तव सादर.
मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.७/३/२०१२

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- श्री. सय्यद अशपाक काजम, फकिरवाडा यांचे नळ कनेक्शन नसतांना त्यांना देण्यांत आलेले सन २००१-२०१२ अखेर बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत विषयी प्रस्ताव आहे.
मा.श्री.लोंढे सु.सो.व मा.श्री. भोसले ग.पुं.:- नळकनेक्शन नसतांना ज्या मालमत्ता धारकांना पाणीपट्टीची बिले देण्यांत आलेली आहेत. त्यांच्याकडील येणे असलेल्या रक्कमा निर्लेखित करणे बाबतचे अधिकार झोन प्रमुखांना द्यावेत.
मा.उपायुक्त (कर) सौ. झगडे मॅडम :- उपायुक्त यांचे नियंत्रणाखाली पाणीपट्टी निर्लेखित करणे बाबत कमिटी नियुक्त केलेली आहे. पाणीपट्टी निर्लेखित करणे बाबतचे अधिकार मा.स्थायी समितीस आहे.
मा.श्री.सातपुते दि.ना. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.
मा.सौ. गायकवाड नि.व. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.
मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मंजुरी देण्यांत यावी.

**<u>ठराव</u>:-** श्री. सय्यद अशपाक काजम, फकिरवाडा यांचे नळ कनेक्शन नसतांना त्यांना देण्यांत आलेले सन २००१-२०१२ अखेर (वॉर्ड क्र.८५ बील क्रमांक ९२१) पाणीपटटी रूपये १६,७००/- (रूपये सोळा हजार सातशे फक्त )चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.सातपुते दिलीप नानाभाउ्र सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंत सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- २**

विषय क्रमांक- ६ शुक्रवार दिनांक १३/४/२०१२

ठराव क्रमांक- ६ शुक्रवार दिनांक १३/४/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** श्री.गवळी नवनाथ पंढरीनाथ, अलमास पार्क, मुकुंदनगर यांचे नळ कनेक्शन नसतांना त्यांना देण्यांत आलेले सन २००७-२०१२ अखेर ( वॉर्ड क्र.८६ बील क्रमांक ७२५) पाणीपटटी रूपये १०,५००/- चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा प्रभाग समिती क्र.३ दि. /१/२०१२

विषय- नळ कनेक्शन नसलेबाबत.

संदर्भ :- श्री. गवळी नवनाथ पंढरीनाथ यांचा दि.२८/७/२०११ रोजीचा अर्ज.

सादर,

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, श्री. गवळी नवनाथ पंढरीनाथ यांनी दि.२८/७/२०११ रोजी माझा अलमास पार्क, मुकुंदनगर येथे गाळा क्र.२ असुन तेथे नळ कनेक्शन नाही. त्यामुळे पाणीपट्टीची आकारणी रद्द करावी असा अर्ज सादर केलेला आहे.

या बाबत वास्तविक परिस्थीती अशी की, वॉर्ड क्र.८६ बील क्र. ७२५ वर श्री. गवळी नवनाथ पंढरीनाथ यांची मिळकत आहे. सदर मिळकतीवर सन २००७-२०१२ अखेर संगणकीय अभिलेखानुसार घरपट्टी रू.३१७९/- व पाणीपट्टी रू.१०,५००/- असे दोन्ही मिळुन रू.१३,६७९/- इतकी शास्ती वगळता थकबाकी आहे.

या प्रभागाकडील जा.क्र. ७८८ दि.१४/१२/२०११ अन्वये पाणी पुरवठा फिटर , प्रभाग समिती क्र.३ यांना सदर ठिकाणी नळ कनेक्शन आहे किंवा कसे ? याचा अहवाल देणे कळविले असता पा.पु. फिटर यांनी श्री. गवळी नवनाथ पंढरीनाथ , अलमास पार्क, गाळा क्र.२ या मिळकतीमध्ये नळ कनेक्शन नाही असा अहवाल जा.क्र. ८५५ दिनांक ३१/१२/२०११ रोजी सादर केलेला आहे.

तसेच या प्रभागाकडील जा.क्र.८४८ दि.२७/१२/२०११ अन्वये श्री.गवळी नवनाथ पंढरीनाथ यांना २०११-१२अखेर घरपट्टी रू.३,१७९/- + शास्ती ३८१/- अशी दोन्ही मिळुन एकूण ३,५६०/-इतकी घरपट्टी भरावी व तद्नंतर आपल्या अर्जाचा विचार करण्यांत येईल. असे कळविले असता संबंधीत अर्जदार यांनी पावती क्र.०५९१९९ दि.१८/१/२०१२ अन्वये रू.३,५६०/- इतकी घरपट्टी संगणकीय अभिलेखानुसार अदा केलेली आहे.

संबंधीत अर्जदार यांनी सन २०११-१२ अखेर संगणकीय अभिलेखानुसार घरपट्टी भरलेली असल्याने व या प्रभागाकडील पाणी पुरवठा फिटर यांनी सदर गाळयामध्ये नळ कनेक्शन नसल्याचे कळविले असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८५ व १५२ नुसार सदरची रक्कम निर्लेखित करणेस्तव आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे वसुली लिपिक प्रभाग समिती क्र.३ यांचा अहवाल असे.

एच.आर.सय्यद :- सादर, सदर ठिकाणी समक्ष पहाणी केली असता तेथे व्हि.डी.ओ. कॅसेट दुकान आहे तेथे कोणत्या प्रकारे नळ कनेक्शन आढळुन येत नाही समक्ष पाहणी

प्रभाग अधिकारी :- सादर, मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ मधील कलम ४८५(१) व कराधान नियम २०(क) तसेच नियम १५२ अनुसार निर्लेखित करणेबाबत व दुरूस्ती करणे योग्य वाटते.

सहाय्यक मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी :- सदरचे प्रकरण मा.आयुक्त साहेब यांनी नेमलेल्या वरिष्ठ अधिकारी यांचे कमिटी कडे पाहणी साठी सादर करण्यांत यावे.

मुख्य लेखापरिक्षक :- सहाय्यक मुल्य निर्धारक व कर संकलन अधिकारी हयांचे अभिप्रायानुसारपुढील आदेशार्थ सादर.

मा.उपायुक्त (कर) :- अहवालानुसार मा.स्थायी समिती पुढे ठेवणेसाठी मान्यतेस्तव सादर.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.१२/३/२०१२

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- श्री.गवळी नवनाथ पंढरीनाथ, अलमास पार्क, मुकुंदनगर यांचे नळ कनेक्शन नसतांना त्यांना देण्यांत आलेले सन २००७-२०१२ अखेर बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ. गायकवाड नि.व.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मंजुरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** श्री.गवळी नवनाथ पंढरीनाथ, अलमास पार्क, मुकुंदनगर यांचे नळ कनेक्शन नसतांना त्यांना देण्यांत आलेले सन २००७-२०१२ अखेर ( वॉर्ड क्र.८६ बील क्रमांक ७२५) पाणीपटटी रूपये १०,५००/-(रूपये दहा हजार पाचशे फक्त) चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंत. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती ,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-२**

विषय क्रमांक- ७ शुक्रवार दिनांक १३/४/२०१२

ठराव क्रमांक- ७ शुक्रवार दिनांक १३/४/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या तिर्थक्षेत्र विकास योजना अंतर्गत अहमदनगर बस्थस्थानक ते माळीवाडा येथील विशाल गणपती मंदिर पोच रस्ता तयार करणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा जा.क्र. सा.बां. वि. दि. १७/०३/२०१२

विषय- फेर टेंडर नोटीस क्र.१/२०११-१२ ई - निविदा क्र.१७७- अहमदनगर महानगरपालिकेच्या तिर्थक्षेत्र विकास योजना अंतर्गत अहमदनगर बसस्थानक ते माळीवाडा येथील विशाल गणपती मंदिर पोच रस्ता तयार करणे या कामाच्या निविदा मंजुरी बाबत.

उपरोक्त विषयांन्वये खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता : मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर क्र/ जिनिसा/तिर्थक्षेत्र-१०-११निवि/संस-४/ दिनांक २९/०९/२०१० अन्वये मान्यता.

२] प्रशासकीय मान्यता रक्कम रू. :- ९०,८३,७६९/- (रस्ता + विद्युत काम)

३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. :- ७५,०८,२५५/-

४] तांत्रिक मान्यतेची दरसुची :- २०११-१२ सा.बां.वि. म.जि.प्रा.

५] निविदा (परिशिष्ट 'ब') रक्कम रू. :- ७५,०८,२५५/-

६] ऑनलाईन ई - निविदा फेर जाहिर निविदा क्र.१ सन २०११-१२ प्रसिध्दी- दि.२९/१२/२०११

७] निविदा विक्री कालावधी :- २९/१२/२०११ ते २०/०१/२०१२

८] निविदा स्विकारण्याची तारीख :- १६/०१/२०१२ ते २०/०१/२०१२

९] निविदा उघडण्याची तारीख :- ०१/०२/२०१२

१०] कामाची मुदत :- ६ महिने

११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :-

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | श्री.ए.पी. सोनीमंडलेचा, अहमदनगर. | २२.०० % जादा |
| २ | मे.बेस्ट कंन्स्ट्र., कंपनी, अहमदनगर | १४.९९ % जादा |
| ३ | मे.साईश्रध्दा कंन्स्ट्र., अहमदनगर | १९.०० % जादा |

वरील तुलनात्मक  तक्त्याच्या अनुषंगाने **मे. बेस्ट कंन्स्ट्र., कंपनी अहमदनगर** यांचा देकार सर्वात कमी म्हणजे १४.९९**%** जादा आहे.सदर कामाचे अंदाजपत्रक सन २०११-१२ चे दरसुची नुसार तयार करण्यात आले होते. सन २०११-१२ चे सुधारित दरसूचीशी अंदाजपत्रकाची तुलना करता सदरचा दर हा **९.८९%** जादा येत आहे.

संबंधीत निविदाधारक **मे.बेस्ट कंन्स्ट्र.,कंपनी, अहमदनगर** यांना दराचे वाटाघाटीकरीता दि.०६/०२/२०१२ रोजी दु.४.००वा. मा.उपायुक्त (सा.) यांचे दालनात समक्ष उपस्थित राहणेबाबत जा.क्र. सा.बां.वि. १८३९/१ दिनांक ०२/०२/१०१२ अन्वये पत्र दिले असता मे.बेस्ट कंन्स्ट्र., कंपनी यांनी समक्ष झालेल्या चर्चेनुसार **४.९९%** जादा दराने (अंदाजित दरापेक्षा) करण्यास तयार असलेबाबत दि.०६/०२/२०१२ रोजी पत्र सादर केले.

संबंधीत ठेकेदार यांनी वरील नमुद प्रमाणे दिलेल्या दराशी व मा.कार्यकारी अभियंता, सार्व. बांधकाम विभाग, अहमदनगर यांचेकडील जा.क्र.प्रशा-२/१०५२५/सन२०१२ दि.०७/०२/२०१२ अन्वये पातळ डांबराच्या नविन सुधारित दराबाबतच्या परिपत्रकानुसार सुधारित दराशी तुलना करता सदरचा दर ०.२७% जादा येत आहे. सदरचा तुलनात्मक तक्ता मा.छाननी समोर दि.१६/०२/२०१२ रोजी सादर केला असता मा.छाननी समितीने सदरचे  काम मे. बेस्ट कंन्स्ट्र., कंपनी यांना निविदा दरापेक्षा ४.९९ % जादा दराने देणेची शिफारस करण्यात आलेली आहे. (सन २०११-१२ म.जि.प्रा. व मा. कार्यकारी अभियंता, सार्व. बांधकाम विभाग , अहमदनगर यांचे पातळ डांबराच्या नविन सुधारित दराबाबतच्या परिपत्रकानुसार सुधारित दराशी तुलना करता सदरचा दर ०.२७% जादा येत आहे) त्याचा तपशील खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १२ | सुधारित देकारानुसार येणारी किंमत | रू.७८,८२,९१७/- |
| १३ | चालु दरसुची सा.बां.वि. २०११-१२अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू.७८,६१,३३०/- |
| १४ | ठेकेदाराची सुधारित किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | रू. २१,५८७/- |
| १५ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (१४ x १००) / १२ | ०.२७% जादा |

तरी मा.छाननी समितीने केलेल्या शिफारशीनुसार सदरची निविदा ठेकेदार मे. बेस्ट कंन्स्ट्र., कंपनी, अहमदनगर यांना निविदा दरापेक्षा **४.९९% जादा** दराने (सन २०११-२०१२ म.जि.प्रा. व मा.कार्यकारी अभियंता, सार्व.बांधकाम विभाग, अहमदनगर यांचे पातळ डांबराच्या नविन सुधारित दराबाबतच्या परिपत्रकानुसार सुधारित दराशी तुलना करता सदरचा दर **०.२७% जादा** येत आहे) देणेस सदरची निविदा मंजुरीस्तव तथा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव पाठविणेस मा.आयुक्त यांनी दि.१६/०३/२०१२रोजी मान्यता दिल्यानुसार सदरची निविदा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे   शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये' वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये' झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- तिर्थक्षेत्र विकास योजना अंतर्गत अहमदनगर बस्थस्थानक ते माळीवाडा येथील विशाल गणपती मंदिर पोच रस्ता तयार करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- सदर विषयाचा ऑफिस रिपोर्ट वाचुन दाखवावा. व पुर्वी दर्शविण्यांत आलेले अंदाजपत्रक यात तफावत आहे काय ?

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. लोंढे सु.सो.:- यात काही फेरबदल आहेत काय?

प्र.शहर अभियंता श्री. सातपुते :- नाही.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- किती दर जास्त आहे ?

प्र. शहर अभियंता श्री.सातपुते :- पुर्वी तयार करण्यांत आलेला विषय व आजचा विषय यात काहीही तफावत नाही. सदर कामाची प्रशासकीय मान्यता रक्कम रु.९०.८३ लाख असुन त्यामध्ये रस्ता व रस्त्यावरील विद्युत कामे समाविष्ट आहेत. सन २०११-२०१२ च्या दरसूची प्रमाणे तांत्रिक मान्यता ७०.०८ लक्ष आहे. सदरचे काम सन २०११-२०१२ चे सुधारीत दरसुची बरोबर तुलना करीता आलेला दर हा ४.९९ टक्के जादा आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. गंधे सु.मो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मंजुरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेच्या तिर्थक्षेत्र विकास योजना अंतर्गत अहमदनगर बस्थस्थानक ते माळीवाडा येथील विशाल गणपती मंदिर पोच रस्ता तयार करणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता मा.छाननी समितीने शिफारस केल्यानुसार स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा धारक मे. बेस्ट कंन्स्ट्र., कंपनी अहमदनगर यांनी वाटाघाटी अंती कमी करून दिलेल्या निविदा दरापेक्षा ४.९९% जादा दराने (सन २०११-२०१२ म.जि.प्रा. व मा.कार्यकारी अभियंता, सार्व.बांधकाम विभाग, अहमदनगर यांचे पातळ डांबराच्या नविन सुधारित दराबाबतच्या परिपत्रकानुसार सुधारित दराशी तुलना करता सदरचा दर ०.२७% जादा येत आहे) देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव. सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गंधे सुमनताई मोहनीराज सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- २**

विषय क्रमांक- ८ शुक्रवार दिनांक १३/४/२०१२

ठराव क्रमांक- ८ शुक्रवार दिनांक १३/४/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे पोहोच रस्ते विकसित करणे या लेखाशिर्षा अंतर्गत प्रभाग क्रमांक ४मध्ये नामदेव चौक ते नित्यसेवा ते भगवानबाबा चौक ते तपोवन रोड पर्यतंचा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा जा.क्र. सा.बां. वि. १७१४ दि.२१/३/२०१२

विषय- ई- निविदा क्र.२०८- प्र.क्र.४ मध्ये नामदेव चौक ते नित्ससेवा ते भगवानबाबा चौक ते तपोवन रोड पर्यंतचा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे या कामाच्या निविदा मंजुरी बाबत.

उपरोक्त विषयांन्वये खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता: मा.महासभा ठराव क्र.७५दि.२९/०३/२०११अन्वये आवश्यक पोहोच रस्ते विकसित करणे या लेखाशिर्षान्वये एकुण १६ कामांसह एकुण खर्च रू.३.११ कोटीस प्रशासकीय मान्यता तसेच मा.आयुक्त यांची दि.१३/०९/२०११ अन्वये अंमलबजावणीस मान्यता.

२] प्रशासकीय मान्यता रक्कम रू. :- २५,००,०००/-

३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. :- २४,९९,६११/-

४] तांत्रिक मान्यतेची दरसुची :- २०१०-११ सा.बां.वि. म.जि.प्रा.

५] निविदा (परिशिष्ट 'ब') रक्कम रू. :- २४,९९,६११/-

६] ऑनलाईन ई - निविदा क्र.२०४ ते २०८ सन २०११-१२ प्रसिध्दी- दि.१०/०२/२०१२

७] निविदा विक्री कालावधी :- १०/०२/२०१२ ते १३/०२/२०१२

८] निविदा स्विकारण्याची तारीख :- १५/०२/२०१२ ते १७/०२/२०१२

९] निविदा उघडण्याची तारीख :- ०२/०३/२०१२

१०] कामाची मुदत :- ६ महिने

११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :-

सदर ई - निविदा क्र.२०४ ते२०८ च्या कामासाठी ऑनलाईन जाहिर निविदा दरपत्रके मागविण्यांत आले होते. सदरच्या कामांसाठी प्रत्येकी एक म्हणजे मे.ए.सी. कोठारी , अहमदनगर यांची एकच निविदा दाखल असल्याने प्राप्त निविदांचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात येउन निविदा अटी शर्तीनुसार पुर्तता केली असल्याने तसेच सदर कामांची हि नियमित ४ थी व फेर निविदा क्र.३ असल्याने आवश्यकतेनुसार एक निविदा प्राप्त असल्यामुळे सदरच्या कामांचा दराचा व्यापारी लिफाफा उघडणे बाबत मान्यतेस्तव अहवाल सादर केला असता मा. आयुक्त यांनी एकच निविदा असल्याने उघडता येईल का ? असा शेरा देउन विचारणा केली असता मा. महाराष्ट्र शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र.१०९४/(२६७९)/ उद्योग -६ दि.३० मार्च १९९४ व मा.महाराष्ट्र शासन निर्णय , ग्रामविकास व जलसंधारण विभाग,परिपत्रक क्र.झेडपीए २००८/प्र.क्र.३५८/वित्त-९ मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक २४ जुन २००८ अनुसार "एखाद्या निविदेला दोनवेळा मुदतवाढ आणि पुरेशी प्रसिध्दी देउनही

एकच निविदा प्राप्त झाल्यास सदरची निविदा शासनाचे कोणत्याही प्रकारचे आर्थिक नुकसार होणार नाही याची पुरेशी खात्री करून उघडण्यास अनुमती दिलेली आहे." त्यानुसार प्राप्त एकच निविदा असल्याने वरील नमुद शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने सदरच्या निविदांचा तांत्रिक लिफाफा उघडणे बाबत अहवाल मा.आयुक्त यांचेकडेस फेर सादर केला असता मा.आयुक्त यांच्या दि.०२/०३/२०१२ रोजीच्या मान्यतेने ई - निविदा क्र.२०४ ते २०८ चा दराचा व्यापारी लिफाफा उघडण्यात आला. त्यामधील ई - निविदा क्र.२०८ च्या प्राप्त दराचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | मे.ए.सी. कोठारी, अहमदनगर | २४.९१% जादा |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने **मे.ए.सी.कोठारी, अहमदनगर** यांचा देकार सर्वात कमी म्हणजे **२४.९१% जादा** आहे.सदरचे कामाचे अंदाजपत्रक सन २०१०-११ चे दरसुची नुसार तयार करण्यात आले होते.सन २०११-१२ चे सुधारित दरसुचीशी अंदाजपत्रकाची तुलना करता सदरचा दर हा ११.६२ % जादा येत आहे.

संबंधीत निविदाधारक मे.ए.सी. कोठारी ,अहमदनगर यांना दराचे वाटाघाटीकरीता जा.क्र.सा.बां.वि. १६४३ /४ दिनांक ०९/०३/२०१२ अन्वये पत्र देउन निविदा दराच्या वाटाघाटीसाठी मा.उपायुक्त (सा.) यांचे दालनात दि.१२/०३/२०१२ रोजी स.११.०० वा. उपस्थित राहणे अथवा अंतिम दर लेखी कळविणेबाबत पत्र दिले असता मे.ए.सी.कोठारी यांनी दि.१२/०३/२०१२ रोजीच्या पत्रान्वये सदरचे काम ११.८०% जादा दराने करणेस तयार असलेबाबतचे पत्र सादर केले आहे.

संबंधीत ठेकेदार यांनी वरील नमुद प्रमाणे दिलेल्या दराशी सन २०११-१२ च्या सुधारित दराशी तुलना करता सदरचा दर **०.१०% कमी** येत आहे. तरी सदरच्या तुलनात्मक तक्ता मा. छाननी समितीसमोर निर्णयास्तव ठेवला असता मा. छाननी समितीने मे.ए.सी. कोठारी, अहदमनगर यांना सदरचे काम निविदा दरापेक्षा ११.८०% जादा दराने करण्याची शिफारस करण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १२ | सुधारित देकारानुसार येणारी किंमत | रू.२७,९७,२८६/- |
| १३ | चालु दरसुची सा.बां.वि. २०११-१२अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू.२७,९४,५६५/- |
| १४ | ठेकेदाराची सुधारित किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | रू.२,७२१/- |
| १५ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (१४ x १००) / १२ | **०.१०% कमी** |

तरी मा.छाननी समितीने केलेल्या शिफारशीनुसार सदरची निविदा ठेकेदारास **मे.ए.सी. कोठारी,अहमदनगर** यांना निविदा दरापेक्षा **११.८०%**जादा दराने (म्हणजे सन२०११-२०१२ सा.बां. वि. च्या चालु दरसुचीशी तुलना करता सदरचा दर **०.१०%कमी** येत आहे.) देणेस सदरची निविदा मा.स्थायी समितीसमोर मंजुरीस्तव तथा निर्णयास्तव पाठविणेस मा.आयुक्त यांनी दि.२०/०३/२०१२ रोजी मान्यता दिल्यानुसार सदरची निविदा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- पोहोच रस्ते विकसित करणे या लेखाशिर्षा अंतर्गत प्रभाग क्रमांक ४ मध्ये नामदेव चौक ते नित्यसेवा ते भगवानबाबा चौक ते तपोवन रोड पर्यतंचा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ. गायकवाड सु.मो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.भोसले ग. पुं.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मंजुरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे पोहोच रस्ते विकसित करणे या लेखाशिर्षा अंतर्गत प्रभाग क्रमांक ४ मध्ये नामदेव चौक ते नित्यसेवा ते भगवानबाबा चौक ते तपोवन रोड पर्यतंचा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा ऑफिस रिपोर्ट पहाता मा.छाननी समितीने शिफारस केल्यानुसार निविदा धारक मे.ए.सी. कोठारी, अहमदनगर यांनी वाटाघाटी अंती कमी करून दिलेल्या निविदा दरापेक्षा ११.८०% जादा दराने (म्हणजे सन २०११-२०१२ सा.बां.वि. च्या चालु दरसुचीशी तुलना करता सदरचा दर ०.१०% कमी येत आहे.) देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंत सही /-

अनुमोदक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका